Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# महात्मा जोतीराव फुले यांचे स्त्री विकासात योगदान

**डॉ. राकेश देवरावजी कभे,** संशोधक प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, म. गांधी कला-वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी
**भूषण देविदास तुरणकर,** मार्गदर्शक, स्नातकोत्तर मराठी विभाग, रा. तु. म. ना. विद्यापीठ, नागपूर

**गोषवारा (Abstract)**

पारंपरिक समाजव्यवस्थेतील स्त्रियांचा विचार करता असे दिसते की, पुरुषप्रधान संस्कृतीने, स्त्रीचे विविध पातळ्यांवर शोषण केले आहे. परंपरेने तिला 'अबला' हे विशेषण लावले आहे. 'चूल आणि मूल' इतकेच तिला सीमित ठेवले. तिच्याकडे पाहत असताना न्यूनत्वाच्या दृष्टिकोणातून पाहिले आहे. 'पुरुषाशिवाय तिला पूर्णत्व येऊच शकत नाही' हे तिच्या मनावर वारंवार बिंबवण्यात आले. यासाठी पुरुषप्रधान संस्कृतीने धार्मिक ग्रंथांचा आधार घेतला. त्याचे लेखनही पुरुषांनी त्यांच्या सोयीप्रमाणेच केले. त्यात विविध युक्त्या वापरण्यात आल्या. धार्मिक ग्रंथांमध्ये स्त्रीचे वर्णन सहनशील, सोशिक, ममतेचा सागर अशारितीने केले गेले. पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडात स्त्री दबतच गेली आणि स्वतःचा आवाज तिचे स्वतंत्र अस्तित्व हरवून बसली. आपण जे त्यागाचे, कष्टाचे जीवन जगत आहोत हेच आपले खरे जीवन आहे. या निर्णयाप्रत तिला आणले गेले. स्त्रीच्या अगतिकतेचे एक अबला म्हणून समाजातील हेच स्थान लक्षात घेऊन १९ व्या शतकात महात्मा जोतीराव फुले यांनी स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्री–पुरुष समानतेचा, स्त्री शिक्षणाचा विचार मांडलेला आहे. हा विचार मांडत असतांना त्यांनी स्त्री शिक्षणाला महत्त्व दिले आहे.

महात्मा जोतीराव फुले यांनी १९ व्या शतकात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून स्त्रियांच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारात,कार्यात स्त्री स्वातंत्र,स्त्री–पुरुष समानता, स्त्री शिक्षण, स्त्रीविषयक प्रश्नांना प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

**सूचनक शब्द (Keywords)** : स्त्री स्वातंत्र्य, स्त्री–पुरुष समानतेचा विचार, स्त्री शिक्षणाचा विचार, स्त्रीविषयक प्रश्न, स्त्री विषयक दृष्टीकोन.

## विषय विवेचन

महात्मा जोतीराव फुले यांनी सामाजिक परिवर्तनाचे कार्य करीत असताना व विचार मांडत असताना संपूर्ण समाजाचा विचार केला. त्याचप्रमाणे तत्कालीन स्त्रियांवर धर्माद्वारे, धर्मग्रंथाद्वारे लादलेल्या अनेक वाईट प्रवृत्तींचाही धिक्कार केलेला आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी केलेले बंड हे कोणत्याही व्यक्ती किंवा धर्माविरूद्ध नव्हते तर ते त्या काळात समाजात अस्तित्वात असणाऱ्या व समाजात विषमता निर्माण करणाऱ्या मूल्यांविरूद्ध होते. महात्मा जोतीराव फुले यांचे स्त्री मुक्तीचे विचार पाहता लक्षात येते की, महात्मा जोतीराव फुले यांच्या मृत्युनंतर १३४ वर्षांनी सुद्धा आपण अजून स्त्रियांच्या गुलामगिरीचे नेमके स्वरूप उघड करण्याच्या शोधात आहोत. स्त्री मुक्तीची व्यापक मोहीम उभारण्याच्या प्रक्रियेत आहोत. १७६ वर्षापूर्वी स्पष्ट स्त्री मुक्तीवादी भूमिका घेणाऱ्या जोतीरावांनी या लढ्याची सुरूवात केली होती. म्हणूनच महात्मा जोतीराव फुले हे १९व्या शतकातील केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताच्या जडणघडणीतील एक द्रष्टे व झुंजार समाजसुधारक होते. भारताच्या इतिहासात समाज प्रबोधनाची प्रखर अशी ज्योत प्रज्वलित करून सामाजिक क्रांतीचे पर्व निर्माण करणारे विचारवंत म्हणून त्यांच्याकडे पाहता


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

येऊ शकते. जातिभेद, धर्मभेद यांचा धिक्कार करून मानवी समतेचा पुरस्कार करणारे ते पहिले भारतीय होत. म्हणूनच अधुनिक भारताच्या स्त्री मुक्तीच्या क्रांतीचे धुरीणत्व निःसंदिग्धपणे महात्मा जोतराव फुले यांच्याकडेच जाते. स्त्रीला या पारंपरिक समाजव्यवस्थेच्या जंजाळातून मुक्त करण्याचे काम महात्मा जोतीराव फुले यांनी केले. त्यासाठी शतकानुशतकांच्या रूढी, प्रथा, परंपरा, भ्रामक कल्पना यांच्याशी लढा देऊन त्या मुळातून हटवण्याचे कार्य महात्मा जोतीराव फुले यांनी केले. या कार्याचे फळ म्हणजे एकविसाव्या शतकातील स्त्री आज स्वतंत्रवृत्तीने बागडत असल्याचे दिसून येते.

"वेदकाळातही स्त्रियांना म्हणावे तसे स्थान नव्हते. आजपर्यंत हिन्दू समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन पूर्णतः एकांगी विषय आणि स्वार्थी असाच राहिला. काळाच्या उत्तरोत्तर स्त्रियांवरील जाचक बंधने वाढतच गेली. आणि समाजातीच स्त्रीचे स्थान कनिष्ठच बनत गेले." मनुस्मृती मध्ये तर स्त्रियांना संरक्षित प्राण्यांचा दर्जा दिल्याचे आढळते. "बालपणी आई-वडील, तरूणपणी पती, आणि म्हातारपणी मुले स्त्रीचे संरक्षण करतात. ती कधीच स्वातंत्र्यास प्राप्त नसते. या शब्दात मनुस्मृतीत स्त्रीचे वर्णन केले आहे." "आजन्म वैधव्य, केशवपन, बालविवाह, पडदा पद्धती, शिक्षणबंदी, स्त्रियांची बालहत्या, बहुपत्नीपद्धती अशा एकापेक्षा एक अमानुष प्रथांची हिन्दू स्त्रीची दशा गुलामाहूनही वाईट बनली होती. एकोणीसाव्या शतकातील हिंदू स्त्रीची दुर्दशा वर्णनापलीकडील होती." थोडक्यात म्हणजे आपल्या अधिकारातील सुखोपभोगाची वस्तू म्हणूनच स्त्रीकडे पाहण्याचा हिन्दू समाजाचा दृष्टीकोन दिसून येतो. या धर्तीवर महात्मा जोतराव फुले यांनी स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त करून दिला. ज्या काळात स्त्रियांना शाळेत घालणे म्हणजे घोर पाप मानल्या जायचे. त्या काळात महात्मा जोतीराव फुले यांनी स्वतःच्या पत्नीला सोबत घेऊन मुलींची पहिली शाळा सन १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात सुरू केली. महात्मा जोतीराव फुले यांच्या सामाजिक कार्यात स्त्रीविषयक प्रश्नांना प्राधान्य दिल्याचे दिसून येते. या संदर्भात भा.ल. भोळे म्हणतात, "स्त्री पुरुष समतेचा पुरस्कार त्या काळात इतक्या मूलगामी युक्तीवाद्यांच्या आधारे व सातत्य राखून करणारे जोतीराव स्त्री मुक्तीचे आद्य कैवारीवच ठरतात. स्त्रि्यासाठी शाळा उघडणे, स्वजनरोष पत्करून स्वतःच्या पत्नीला साक्षर करून त्या शाळेत शिकविणेस सांगणे, विधवांचे केशवपन करणाऱ्या न्हाव्यांचा संप घडवून आणणे, कोणाच्या तरी छाद्माला वा सक्तीला बळी पडून मातृत्व लादल्या गेलेल्या निराधार स्त्रियांसाठी प्रसृतीगृह उघडणे अशा प्रकारची भक्कम कामगिरी त्यांनी केली होतीच. तसेच स्त्रीदास्याच्या कारणांचाही खोला जाऊन शोध घेतला होता. त्याकाळात लोकहितवादी, भांडारकर, रानडे, आगरकर मलबारी प्रभृतींनी हा स्त्रीप्रश्नांचा विचार केला होता. एकूण हिंदू संस्कृतीचा व विषमताधिष्ठीत उतरंड वजा समाजरचनेचा एक भाग म्हणूनच त्यांनी स्त्रियांच्या गुलामगिरीचा विचार केलेला दिसून येतो." सामाजिक संरचना क्रांतीकारकरित्या संपूर्णपणे बदलल्याशिवाय स्त्रियांची बंधमुक्तता होणार नाही असा महात्मा जोतीराव फुले यांचा दृष्टीकोन होता.

महात्मा जोतीराव फुले यांचा स्त्रीदास्थाकडे पाहण्याचा दृष्टीकोन भिन्न होता. समाजात स्त्री सुधारणा घडवून आणायची तर स्त्रियांना आधी शिक्षण दिले पाहिजे. सर्व स्त्रियांना शिकवून शहाणे बनविले पाहिजे. स्त्रिया आणि अस्पृश्यांची गुलामगिरी मुक्त होण्यासाठी ते आवश्यक आहे. म्हणून समाजातील सर्व स्तरातील स्त्रियांच्या शिक्षणाची सोय करून देणे हे महात्मा जोतीराव फुले यांना महत्त्वाचे वाटले."घरातील स्त्री शिकली की कुटुंबात शिक्षणाचा प्रसार होईल. ती शहाणी झाली की संबंध कुटुंब शहाणे होईल.मग कुटुंबाकुटुंबामधून ज्ञानाची गंगा वहात जाईल.अशा प्रकारचे विचारप्रवाह त्यांच्यामनात येत


Copyright © | JET Network, All Rights Reserved

होते.” या कार्याची सुरूवात आपल्या घरातूनच करावी म्हणून स्वतःची पत्नी सावित्रीबाई यांना त्यांनी शिकवण्यास सुरुवात केली.

“स्त्रियांसाठी सहानुभूती म्हणून एक दोन हक्क देणे हे फुल्यांना मान्य नव्हते, तर या उलट स्त्रियांना त्यांचा एक मूलभूत हक्क म्हणून समाजजीवनात पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळावयास हवे. असे फुल्यांचे मत होते.” विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न हा जरी ब्राह्मण आणि उच्च जातींशी निगडीत होता, तरी विधवांची ती दैन्यावस्था, त्यांचे नैतिक अधःपतन महात्मा जोतीराव फुले यांना बघवत नव्हते. भ्रूणहत्या नको होती. यातून विधवांची सुटका करणे जरूरीचे होते. विधवापुनर्विवाहाची चाल सुरू करण्यासाठी महात्मा जोतीराव फुले प्रयत्न करू लागले.

“शेणवी जातीतील एका विधवेचा एका शेणवी विधुराबरोबर ८ मार्च १८६० रोजी पुण्यात पुनर्विवाह झाला. ती विधवा अठरा वर्षांची होती. ती बातमी प्रसिद्ध करून ‘ज्ञानप्रकाशांने’ असे म्हटले की, ‘आम्ही याच्यावर काही मत देण्याची आवश्यकता नाही. जोतीरावांनी १८६४ साली एका शेणवी विधुराचा पुनर्विवाह घडवून आणला असे जे म्हणतात तो पुनर्विवाह वर उल्लेखिलेला पुनर्विवाहच असावा असे दिसते.” अशा प्रकारे महात्मा जोतीराव फुले यांनी विधवांनाही स्वतःचे जीवन नव्याने जगण्याचे हक्क आहेत याची जाणीव करून देतात. यातून त्यांचा स्त्री विषयक दृष्टीकोन स्पष्ट दिसून येतो.

मातृवंशपरंपरा संपुष्टात आल्यावर मुख्य प्रश्न निर्माण झाला तो विवाहबाह्य संबंधातून जन्मलेल्या दुर्दैवी बालकांचा. यामध्ये खरा गुन्हेगार हा जन्मदाताच असतो. परंतु त्याचे प्रायश्चित मुलांना मिळते. पुरुष स्त्रीवर अत्याचार करून किंवा तिच्याशी विवाहबाह्य संबंध प्रस्थापित करून, तिच्या असाह्य स्थितीचा फायदा घेऊन वा तीला मोहात पाडून हा गर्भ तिच्यावर लादतो. मातृत्वापासून मग स्त्री सुटका करून घेण्याचा प्रयत्न करण्यास असमर्थ ठरली तर नाईलाजास्तव आत्महत्येला बळी पडते. किंवा त्या निरपराध मुलाला जन्म देऊन उघड्यावर टाकून देते. किंवा जन्मतःच त्या अर्भकास मारले जाते. ही सर्व स्थिती पाहून समाजातील अशा स्त्रियांची या दुष्टचक्रातून सुटका व्हावी म्हणून त्यांनी इ.स. १८८३ च्या सुमारास बालहत्या प्रतिबंधक गृहाची संस्था स्थापन केली.

“ब्राह्मण व प्रतिष्ठित समाजातील स्त्रियांच्या या करूणास्पद स्थितीविषयी जोतीबांनी ‘दिनबंधू’ या वृत्तपत्रातून लेखमाला सुरू केली. याचा परिणाम म्हणून न्हावी लोकांनी एक सभा बोलाविली व त्या सभेत न्हाव्यांनी विधवांचे केस कापू नयेत हा ठराव संमत झाला. या सभेची बातमी इंग्लडमध्ये समजताच इंग्लंडमधील स्त्रियांनी न्हाव्यांना या कार्याबद्दल अभिनंदनपर पत्र पाठविले.” अशा प्रकारच्या स्त्रियांच्या केशवपनाचा विघातक रूढी बंद करण्यासाठी महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊन न्हावी लोकांनीही त्यांच्या कार्यास सहाय्य केल्याचे दिसून येते. स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे. समाजातील सती प्रथा,हुंडा पद्धती, अंधश्रद्धा नष्ट झाली पाहिजे असे महात्मा जोतीराव फुले यांना वाटायचे. “महात्मा फुल्यांचे या कार्याद्वारे स्वीमुक्तीचे विचार दिसून येतातच. शिवाय त्यांनी लिहिलेल्या ‘सार्वजनिक सत्यधर्म’ या पुस्तकातूनही पहावयास मिळतात. त्यांनी लग्न म्हणजे काय? याचे उत्तर स्पष्ट करताना म्हटले आहे की, हर एक मानव पुरूष व स्त्री हे उभयंता मरेतोपावेतो एकमेकांचे साथी व साह्यकारी होऊन एकचित्ताने वर्तन करून त्यांनी सुखी व्हावे, म्हणून जी काही कबुलायत करण्याची वहिवाट घातली आहे, त्यास लग्न म्हणतात.” यावरुन त्यांनी दोघानांही समान लेखल्याचे दिसते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

महात्मा जोतीराव फुले यांच्या 'सत्सार-२' या पुस्तकात पंडिता रमाबाई आणि ताराबाई शिंदे यांचे तर त्यांनी अभिमानाने कौतुकास्पद उल्लेख केलेला आहे. यावरुन त्यांनी स्त्री स्वातंत्र्याच्या, स्त्री मुक्तीच्या, स्त्री कर्तृत्व आणि विकासाच्या नव्या वाटा धुडाळणाऱ्या स्त्रियांना प्रोत्साहन दिलेले आहे. स्त्रियांना मुक्त करण्याऱ्यांचे महात्मा जोतीराव फुले प्रेरणा शक्ती बनल्याचे दिसते. वरील स्त्रियांच्या कार्यावरुन आपल्याला जमेल तशी, झेपेल तशी त्यांनी महात्मा फुल्यांच्या कार्याला प्रयत्नांना साथ दिली. काहींनी अनागिक राहूनही कार्य केलेले आहे.

महात्मा जोतीराव फुले यांनी 'अखंडादि काव्यरचना' मध्येही स्त्री मुक्तीचे विचार, स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या रूपाने मांडले आहेत.

"स्त्रीपुनर्विवाह करण्याची बंदी ।। अन्यायाची धुंदी।। थांग नाही ।।१।। (स.वा.४५२)
स्त्री पुरूष हक्क सर्वां कळवावे।। सत्याने बोधावे ।। मानवांस ।।२।। (स.वा.४७१)
व्यभीचारासवें व्यसनी अम्मल।। भार्येची अक्कल।। गुंग केली ।।१।। (स.वा.४७५)
निर्लज्ज होऊनी फुगड्या खेळतो।। पकव्यास घालितो।। स्त्रियासंगे ।।३।। (स.वा.४७७)
भट पेशवा जो नाना।। छेदी स्त्रियालेकरांना ।।१३।।
बहु स्त्रीयांचा हा पती।। स्त्रीस का उलटी रीती ।।१४।। (स.वा.४८०)
शुद्र मुलीमुला शाळेत घालावें।। सुशील करावे।। सर्व कामी ।।३।। (स.वा.४८६)
आर्या अवतार परशुरामाचा।। वैरी विधांचा।। बाळे वर्षी ।।९।। (स.वा.४९०)
नाटकांत भट स्त्री वेश होती।। नाक उडविती।। वेश्येपरी ।।१५।। (स.वा.४९१)
ढोंगासाठी खळ वर्दळीस येती।। यवना निंदीती।। चुलींपाशी।।३७।। (स.वा.४९१) "

महात्मा जोतीराव फुले यांनी आपले विचार काव्यात्मक रूपाने देखील मांडले आहे. स्त्रियांच्या दुःखाची व्यथा महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या विविध लिखाणातून स्पष्ट केली आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात बहुपत्नी विवाहावर त्यांनी टीका केलेली आढळते. ते म्हणतात, काही पुरूष दोन-तीन लग्नाच्या बायका करून त्यास धर्माचा आधार देतात. पण स्त्रियांनी जर दोन-तीन नवरे केले तर पुरूषांना हे चालणार नाही. मग हे पुरूषी आचरण स्त्रियांस कसे आवडेल? एकंदर सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असता स्त्रियांस एक व पुरुषास एक असे नियम लागू करणे म्हणजे निव्वळ पक्षपात होय. अशा पद्धतीने महात्मा जोतीराव फुले यांनी समाजातील दुष्ट चाली बंद करण्यासाठी पाऊल उचलले.

**निष्कर्ष**

एकंदरीत स्त्री मुक्तीचे विचार लिखित स्वरुपात न ठेवता त्यांनी स्त्रीदास्यातून स्त्रीला मुक्त करण्याचे कार्य हाती घेतले. त्यांचे कार्य हे 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे होते. महात्मा जोतीराव फुले यांनी पुरूषप्रधान्ता आणि पितृसत्तकतेवर प्रकाश झोत टाकून बहुजन समाज कुटुंबातील स्त्रियांच्या दडपणूकीवर प्रश्नाचीही मांडणी केलेली आहे. पारंपरिक समाजव्यवस्थेत खितपत पडलेल्या स्त्रीयाच्या विकासाराठी अविरत प्रयत्न केले आहे. तत्कालीन समाजात स्त्री वर्गावर अधिक प्रमाणात अत्याचार होत होते. विधवेस पुनर्विवाह करण्याचा अधिकार नाही. स्त्री-पुरूष हे दोघे समान आहेत. त्यांचे हक्क,अधिकार समान आहेत. घरी पत्नी असताना पती व्यभिचार करतो, स्त्रिया-मुलांना छळले जाते. अनेक स्त्रियांचा पुरूष पती असतो. मग एकट्या स्त्रीलाच का उलटी रीत लागू आहे? शुद्रांतिशुद्रांनी मुला-मुलींना शाळेत घालून शिकवून सुशिक्षित बनवावे. विधवांचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न व्हावा. असा स्त्री विकासाचा मार्ग साहित्यात


Copyright © | JET Network, All Rights Reserved

मांडणी करून त्यांनी समाजाला विचार करण्यास भाग पाडले. पारंपरिक समाजव्यवस्थेतील स्त्रियांच्या विकासात व्यत्यय आणणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरा, भ्रामक कल्पना यांच्याशी लढा देऊन त्या मुळातून हटवण्याचे कार्य महात्मा जोतीराव फुले यांनी केले.

**संदर्भग्रंथ सूची**

१. उगले जी. ए., महात्मा फुले एक मुक्त चिंतन, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०००.
२. ऑम्व्हेट डॉ. गेल, जोतीबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार, लोकवाङ्मय गृह, मुंबई प्रथमावृत्ती, १९९०.
३. कऱ्हाडे वीणा, महात्मा जोतीबा फुले, लोकवाङमय गृह, मुंबई, ३ री आवृत्ती, १९९०.
४. कीर डॉ.धनंजय, मालशे स.ग., फडके डॉ.य.दि.(संपा), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती सहावी २००६.
५. खराट संभाजी, म. फुले आणि सत्यशोधक जलसे, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९०.
६. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, महात्मा फुले प्रेरणा व तत्वज्ञान, म. जोतीबा फुले प्रतिष्ठान प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९०.
७. तायडे डॉ. सौ. पुष्पा व इतर (संपा), क्रांतिरत्न, ग्रॅव्हिटी पब्लिकेशन, अकोला, पहिली आवृत्ती, २०२१.
८. देसाई वसंत, महात्मा जोतीराव फुले,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,पहिली आवृत्ती, १९६५.
९. नरके हरी (संपा), महात्मा फुले गौरवग्रंथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजश्री शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००६.
१०. नरके हरी (संपा),महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन, मुंबई.
११. पाटील पंढरीनाथ, म. फुले यांच्या अप्रकाशित आठवणी, रघुवंशी प्रकाशन, पुणे.
१२. फडके भालचंद्र, फुले-आंबेडकर शोध आणि बोध, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८५. भोळे
१३. भा. ल., जोतीरावांची समता संकल्पना, लोकवाङमय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती १९९०.
१४. मगर (भिंगारे) सौ. निर्मला, जोतिराव फुल्यांची समाजपरिवर्तन नीती, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९१.
१५. रानडे डॉ. गो. मो., म. जोतिबा फुले, मंगलप्रकाशन, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९१.
१६. वैध प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङमय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती १९७४.


Copyright © | JET Network, All Rights Reserved